महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०३ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १५८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# बदलापुरात मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापूर : तब्बल साडेदहा वर्षानंतर झालेल्या कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या

निवडणुकीसाठी मंगळवारी सरासरी ६० टक्के मतदान झाल्याची माहिती सायंकाळी उशिरा निवडणूक अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ५८ टक्के मतदान झाले होते. रात्री उशिरापर्यंत सर्व मतदान केंद्रांवरून माहिती संकलित केली जात होती. अंतिम मतदानाचा आकडा उशिरापर्यंत मिळू शकला नाही. मात्र तीन मतं देत असताना होणारा उशीर मतदानाची टक्केवारी घसरण्यासाठी कारणीभूत ठरल्याची चर्चा रंगली.

मंगळवारी कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी मतदान



## साडे पाचपर्यंत सरासरी 58 टक्क्यांची नोंद

पार पडले. सकाळपासूनच मतदारांच्या रांगा मतदान केंद्राबाहेर लागल्या होत्या. अनेक ठिकाणी मतदान केंद्रात मतदान यंत्र बंद पडल्याने खोळंबा होत होता. त्यातच यंदा द्विसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे आणि थेट नगराध्यक्ष निवडणुकीमुळे मतदाराला एकाच वेळी तीन मते द्यायची होती. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आणि प्रशासनाने याबाबत जनजागृती केली असली तरी मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांमध्ये याबाबत संभ्रम होता. अनेक जणांना तीन मतांचे गणित कळत नव्हते. परिणामी तीन मते देऊन प्रक्रिया पूर्ण होण्यात वेळ लागत होता. अशावेळी बाहेर मतदारांच्या रांगा वाढतच होत्या.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सायंकाळी साडे पाच वाजता जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार बदलापुरात सरासरी ५८.३० टक्के मतदान झाले होते. काही प्रभागांमध्ये मतदानाचा टक्का हा ७० टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे दिसून आले. तर काही प्रभागांमध्ये मतदानाची टक्केवारी ४७ टक्क्यांवर स्थिरावली. मात्र सायंकाळी साडेपाच नंतरच्या आकडेवारीत ही टक्केवारी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली. रात्री उशिरापर्यंत मतदानाची अंतिम आकडेवारीची माहिती संकलित केली जात होती. मात्र सरासरी ६० टक्क्यांवर मतदानाचा आकडा गेला असावा असा अंदाज आहे.

प्रभाग क्रमांक एक, चार आणि १३ येथील केंद्रांवर मतदान यंत्रात तांत्रिक बिघाड झाल्याने अर्धा ते दिड तास रांगेत ताटकळत उभे रहावे लागल्याने मतदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यामुळे या मतदार केंद्राबाहेर रांगा कायम होत्या.

## 21 डिसेंबरला मतमोजणी

राज्यातील 246 नगरपरिषद व 42 नगरपंचायतींसाठी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि.02 डिसेंबर 2025 रोजी मतदान आणि दि.03 डिसेंबर 2025 रोजी मतमोजणी नियोजित होती परंतु मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट याचिकेच्या सुनावणीमध्ये देण्यात आलेल्या निर्णयानुसार दि.3 डिसेंबर 2025 रोजी होणारी मतमोजणी ही आता दि. 21 डिसेंबर 2025 रोजी करावी व तसा निकाल घोषित करावा, असे न्यायालयाचे आदेश आहेत. तसेच न्यायालयीन अपील दाखल झाल्याने बाधित झालेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतींकरिता मतदान दि.20 डिसेंबर 2025 रोजी तर मतमोजणी दि.21 डिसेंबर 2025 रोजी नियोजित असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी दिली आहे. याआधी आयोगाने 2 आणि 3 डिसेंबर 2025 रोजी मतदान प्रक्रिया निश्चित केली होती. मात्र न्यायालयाच्या आदेशामुळे संपूर्ण कार्यक्रमात सुधारणा करण्यात आली आहे. संबंधित सर्व जिल्हाधिकारी व निवडणूक अधिकारी यांना नव्या तारखेनुसार तयारी करण्याचे आदेश देण्यात.

## लक्षवेधी

## पेण : २३ हजार ८१४ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी) :** पेण नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक आज २ डिसेंबरला पार पडली असून, पुरुष १६६०४ स्त्रीया १७२७१ अशा एकूण ३३ हजार ८७५ मतदारांपैकी सायंकाळी साडेपाच वाजता पुरुष-१२ हजार २०८ स्त्रीया -११हजार६०६ इतर 0एकूण २३ हजार ८१४असे पुरूष व महिला तरुण व वयोवृद्ध यांनी मतदानाचा हक्क बजावला असून ७०.३० टक्के मतदान झाले

पेण येथे नगराध्यक्ष पदासाठी तीन उमेदवार तर २४ जागांपैकी ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. नगरसेवकांच्या १८ जागांसाठी एकूण ४६ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर शहरात १२ प्रभागांत ४१ मतदान केंद्रात सुरळीत पणे मतदान झाले. सर्व केंद्रांवर आवश्यक सुविधा, कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि सुरक्षेची तयारी पूर्णपणे चोख करण्यात आली होती. यासोबतच राखीव पथक, उड्डाण पथक आणि पोलिस निवडणुकीसाठी सज्ज होते. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

## मेल एक्स्प्रेसचा लोकलवरील परिणाम हलका होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गेल्याकाही वर्षांपासून मध्य रेल्वे मार्गावर प्रवाशांचा प्रचंड ताण आला असून प्रवाशांच्या तुलनेत रेल्वेच्या सेवा अपुऱ्या पडत आहेत. यामुळे प्रवासी हतबल झाले असून अपघात किंवा वादाचे प्रसंग रेल्वे मार्गावर नित्याचे झाले आहे. परंतु येत्या वर्षभरानंतर हा प्रवास काहीसा सुखकर होण्याची चिन्हे आहेत. कारण, मध्य रेल्वेच्या काही स्थानकांवर नव्या फलाटांची निर्मिती होत आहे. त्यामुळे एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांचा लोकलवर होणारा ताण काहीसा हलका होणार आहे.

मध्य रेल्वे मार्गावर प्रवासा दरम्यान लोकल वेळेत न येणे, एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीमुळे लोकल खोळंबा होत असतो. ठाणे पल्ल्याडील नागरिकांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. अनेकदा एक्स्प्रेसमुळे लोकलचे वेळापत्रक २० ते २५ मिनीटांनी खोळंबते. तसेच एखादे इंजिन बंद पडल्यास प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. मध्य रेल्वेने सेवांची क्षमता वाढावी यासाठी विकासकामे सुरु केली आहेत. यामध्ये कल्याण, पनवेल, परळ आणि लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) या स्थानकांचा सामावेश असून प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन येथे मोठ्याप्रमाणात बदल होणार आहे.



## राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीराचे आयोजन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण / नरेंद्र पाटील**

वासिंद जवळील सारमाळ गावांत गुरुकुल महाविद्यालय, घाटकोपर यांच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

साईबाबा मंदिर सभागृह येथे दि. 24 ते 30 नोव्हेंबर 2025 दरम्यान पार पडलेल्या या शिबीरात योगा प्रशिक्षण, महिला सक्षमीकरण,पथनाट्य,अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामस्वच्छता अभियान, वृक्ष रोपण, गावातील मुलांना खाऊ आणि शैक्षणिक साहित्य वाटप, महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ तसेच वासिंद स्मशानभूमी परिसरात साफसफाई आणि सारमाळ नदीवर केटी बांधारा बनवून आदी इतर उपक्रम राबविण्यात आले तर या शिबिरात 140 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

यावेळी पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर, आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट वक्ते दिनेश गुप्ता यांनी योग्य मार्गदर्शन करून राजेंद्र कोळी यांनी अंधश्रद्धा निर्मूलन बाबत माहिती दिली. या शिबिरात महाविद्यालय प्राचार्या डॉ. ममता राणे, विजय भारती जैन, राजेंद्र वारे, मोहम्मद झाइंउद्दीन खान आदीजण उपस्थित होते. तर यासाठी येथील पो.पा.रामदास राव, सामाजिक कार्यकर्ते दत्ताराम राव, जय भगवान महिला बचत गटातील सदस्य महिला व साईबाबा सेवा मंडळाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त 15 विशेष गाड्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दरवर्षी महाराष्ट्र आणि देशभरातून लाखो अनुयायी मुंबईत येत असतात. यंदाही लाखो आंबेडकर अनुयायी मुंबईत येण्याची अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर, मध्य रेल्वेने प्रवाशांची अपेक्षित गर्दी लक्षात घेऊन त्यांच्या सोयीसाठी विस्तृत व्यवस्था केली आहे. गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी, 4 ते 8 डिसेंबर 2025 या कालावधीत रेल्वेने 15 विशेष अनारक्षित गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्या प्रामुख्याने नागपूर-सीएसएमटी, दादर-नागपूर, कलबुर्गी-सीएसएमटी, अमरावती-सीएसएमटी आणि कोल्हापूर-सीएसएमटी या महत्त्वपूर्ण मार्गांवर धावणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर-मुंबई विभागात सर्वाधिक रेल्वे सेवा उपलब्ध असतील. या गाड्यांच्या तारखा, वेळापत्रक, थांबे आणि कोच संरचना मध्य रेल्वेने जाहीर केली आहे. या गाड्या नागपूर, अमरावती, कलबुर्गी आणि कोल्हापूर येथून मुंबई-दादर मार्गासाठी उपलब्ध असतील.

## वाहतुक कोंडी फोडण्यासाठी भिवंडीतील वळण रस्ते बंद करण्याचा प्रस्ताव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे-भिवंडी शहराला जोडणाऱ्या कशेळी-अंजुरफाटा मार्गावरील वाहतुक कोंडी फोडण्यासाठी ठाणे वाहतुक पोलिसांनी येथील काही वळण रस्ते बंद करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिला आहे. हे वळण रस्ते बंद झाल्यास जड-अवजड वाहनांमुळे वाढणारा भार आणि विरुद्ध दिशेने होणारी वाहतुक बंद होण्यास मदत होईल.



भिवंडी येथील कशेळी-काल्हेर, पूर्णा, दापोडे अंजुरफाटा भागात मोठ्याप्रमाणात लोकवस्ती आहे. तसेच या भागात काही कंपन्यांची कारखाने, गोदामे देखील आहेत. सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय नसल्याने या भागातील नागरिकांना त्यांच्या खासगी वाहनाने ठाणे, भिवंडी गाठावी लागते. तसेच मुंबई नाशिक महामार्गावरील कोंडी टाळण्यासाठी विविध भागातून व्यापारी, नोकरदार, मालवाहू वाहने भिवंडीत प्रवेश करण्यासाठी या मार्गाचा वापर करतात. गेल्याकाही महिन्यांपासून या भागात मोठ्याप्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. येथे ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो पाच मार्गिकच्या निर्माणाची कामे सुरु असून रस्ते देखील अरुंद झाले आहेत. काल्हेर - कशेळी भागातील अनेक विद्यार्थी ठाण्यातील विविध शाळांमध्ये शिकतात. अनेकदा वाहतुक कोंडीमुळे विद्यार्थ्यांना बाळकूम ते कशेळी पर्यंत पायपीट करत घर गाठावे लागले. येथील वाहतुक कोंडी जड अवजड वाहने आणि विरुद्ध दिशेने होणाऱ्या वाहतुकीमुळे वाहतुक कोंडी वाढत असल्याचे ठाणे वाहतुक पोलिसांच्या सर्वेक्षणात प्राप्त झाली होती.

## शहापुर : साने गावात सातशेहून अधिक कोंबड्यांवर वन्य प्राण्याचा हल्ला !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यात एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. शहापुर तालुक्यातील एका गावात कुक्कुटपालनाचा व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याच्या साडेसातशे पक्ष्यांवर एकाच वेळी वन्य प्राण्याने हल्ला केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकारावरुन संपूर्ण तालुक्यात खळबळ पसरली आहे.

शहापुर तालुक्यातील साने नावाचे गाव आहे. या गावात सागर पाटील हे आपल्या कुटूंबासह गेले अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहे. पूर्वी शेतीवर त्यांचा उदरनिर्वाह सुरु होता. परंतु, अवकाळी पावसाने अनेकदा शेतीचे नुकसान होऊन आर्थिक फटका सहन करावा लागत होता. यासाठी सागर यांनी शेतीसह कुक्कुटपालनाचा जोड व्यवसाय सुरु केला. गेले तीन वर्षांपासून ते कुक्कुटपालनाचा व्यवसाय करत आहेत. सध्या त्यांच्या पोल्ट्रीमध्ये १३०० कोंबड्या होत्या. या कोंबड्या विक्रीसाठी तयार झाल्या होत्या. पुढील काही दिवसातच चांगल्या किंमतीत या कोंबड्यांची विक्री होणार होती. परंतू, या कोंबड्यांची विक्री होण्याआधीच या पोल्ट्रीमधील ७५० कोंबड्या सोमवारी रात्री मृतावस्थेत आढळून आल्या. या प्रकारामुळे संपूर्ण गावात खळबळ पसरली आहे. परंतु, हा हल्ला नेमका कोणी आणि कसा केला याची अद्याप स्पष्टता झालेली नाही. परंतु, या पोल्ट्री फार्मच्या लगत जंगल परिसर आहे. या जंगलात अनेक वन्य प्राण्यांचा वावर असून त्या वन्य प्राण्यांपैकीच कोणत्या तरी एका प्राण्याने या पक्ष्यांवर हल्ला केल्याची शक्यता गावातील नागरिकांकडून वर्तवली जात आहे.

**या प्रकारामुळे शेतकरी सागर पाटील हे धास्तावले आहेत. पुढच्या काही दिवसातच पक्ष्यांची विक्री होणार होती. मात्र, पोल्ट्री लगत असलेल्या जंगल परिसरातील वन्य प्राण्याने पोल्ट्री मधील पक्ष्यांवर हल्ला करून जीव घेतला. यामध्ये दोन लाख रुपयांचे नुकसान झाले असून या नुकसानीची भरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.**

## ठाणे मनपाची ७३ बांधकामांवर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** देशभरात प्रदूषणाची गंभीर परिस्थिती निर्माण होत असतानाच, ठाणे महापालिकेने प्रदूषणकारी ७३ बांधकामांवर कारवाई केली. त्यांना १८ लाख १५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. मागील ११ महिन्यांत ही कारवाई केल्याचे महापालिका सूत्रांनी सांगितले. ठाण्यात मागील काही वर्षांमध्ये मोठ्याप्रमाणात बांधकामे वाढली आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रातील घोडबंदर, तीन हात नाका, कोलशेत, कळवा भागात या भागात सर्वाधिक गृहनिर्माण प्रकल्पांची उभारणी होत आहे. या बांधकामास्थळी शहरातील प्रदूषणामध्ये अधिक वाढ होते. ठाणे महापालिकेच्या शहर विकास विभाग आणि प्रदूषण नियंत्रण विभागाकडून १ जानेवारी ते ३० नोव्हेंबर या कालावधीत एकूण ३७७ बांधकाम प्रकल्पांची स्थळ-पाहणी करण्यात आली. यापैकी तब्बल ७३ ठिकाणी बांधकाम व्यावसायिकांनी पर्यावरणीय नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून आले. त्यामुळे नियमांचे भंग करणाऱ्या बांधकामांवर १८ लाख १५ हजार रुपयांची दंडात्कम कारवाई करण्यात आली.







## बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाची विशेष यंत्रणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुरबाड तालुक्यात जिल्हा प्रशासनाच्या सतर्कतेमुळे नुकतेच दोन बालविवाह रोखण्यात आले होते. याच पार्श्वभूमीवर आता जिल्हा प्रशासनाकडून बालविवाह रोखण्यासाठी एक मोठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हाभरात २५०० हून अधिक अंगणवाडी सेविकांचे विशेष प्रशिक्षण घेण्यात येत असून, या मोहिमेत स्थानिक पोलीस पाटील, ग्रामसेवक, आशा कार्यकर्त्या, स्थानिक शिक्षक तसेच समुदायातील प्रमुख व्यक्तींना देखील सहभागी करून घेतले जात आहे. बालविवाह रोखणे, त्याबाबत मिळणाऱ्या माहितीची तत्काळ नोंद आणि प्रतिबंधात्मक कारवाई या सर्व बाबींची सुसंगत आखणी करून जिल्हा प्रशासनाने एक मोठी साखळी कार्यान्वित केली आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर आणि भिवंडी या भागांमध्ये गेल्या काही महिन्यात बालविवाहाची प्रकरणे उघड झाली आहेत. जिल्हा बालसंरक्षण विभाग तसेच यामध्ये प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांच्या सतर्कतेमुळे हे बालविवाह रोखण्यात यश आले असले तरी बालविवाहाचे हे सर्व प्रकार थांबविण्यासाठी प्रशासनाकडून व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या प्रशिक्षणांत 'बालविवाह प्रतिबंधक कायदा', त्यातील तरतुदी, बालविवाह थांबवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया, तातडीची हस्तक्षेप योजना आणि संबंधित विभागांशी समन्वय कसा साधायचा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे. अंगणवाडी सेविका आणि इतर ग्रामस्तरीय अधिकारी हे स्थानिक पातळीवर सर्वात प्रथम माहिती मिळवणारे घटक असल्याने त्यांना सजग आणि कार्यक्षम बनविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

## वाचक मनोगत

# मतदान केल्याची पोचपावती हवी

निवडणुकीमध्ये नोकरदार व्यक्तींना मतदानासाठी सुट्टी जाहीर करण्यात येते . मतदान करणे हे लोकशाहीतील नागरिकांचे कर्तव्य आहे परंतु हे मतदार हे हक्काची सुट्टी समजून कुठेतरी एकत्र जाऊन मजा करतात सहलीसाठी वापरतात नाहीतर आपणच हुशार असे समजून घरातच लोळत पडलेले असतात आणि तो आपला हक्क आहे असे समजतात, तो मतदान करण्यास जातच नाही, मिळालेली फुकटची सुट्टी मात्र उपभोगतो, त्यामुळे मतदानावर परिणाम होतो,मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे हे तो विसरून जातो. निवडणूक आयोगाने निषेध किंवा नाराजी व्यक्त करण्यासाठी सुद्धा पर्याय ( NOTA )उपलब्ध करून दिलेला आहे तो त्यांनी बजवावा. मतदान केल्यावरती त्याचा पुरावा म्हणून बोटावर तीन-चार दिवस न जाणारी शाईची खुण असते. जे मतदान करणार नाहीत त्यांची सुट्टी रद्द करावी.निवडणूक आयोगास सुचवावे असे वाटते की ज्या मतदारांना सुट्टी जाहीर झाली आहे त्यांना मतदान केल्याची पोचपावती देण्याची व्यवस्था करावी जेणेकरून ते ज्या कार्यालयात काम करतात तिथे त्यांनी ती जमा करावी, त्याच कामगाराला ती मोफत सुट्टी लागू होईल. अशा या व्यवस्थेमुळे या सुट्टीचा गैरप्रकार करणाऱ्यांना आळा बसेल आणि मतदान टक्का सुद्धा वाढेल. एकंदरीत काय तर मतदान सक्तीचे करण्यासाठी काहीतरी ठोस उपाय योजना हवी.

**( श्री.सुनील इंगळे,
सामाजिक कार्यकर्ते,
खडकपाडा.कल्याण.)**

# भजन सम्राट अनुप जलोटा यांनी भिवंडीतील भाविकांना केले मंत्रमुग्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरातील कामतघर भागातील ताडाळी - ठाकराचा पाडा येथील स्वामी गंभीरानंद नवनिर्माण ट्रस्टचे परमपूज्य स्वामी श्री गंभीरानंद सरस्वती महाराज यांच्या संकल्पनेतून, भगवान शिवाच्या प्राचीन नगरी काशीमध्ये गायी आणि वेदांच्या रक्षणासाठी श्री काशी विश्वनाथ गुरुकुलची स्थापना केली जात आहे. या निमित्ताने श्री.काशी विश्वनाथ गुरुकुलच्या जमिनीचे दान आणि बांधकामाच्या निमित्ताने भिवंडीतील ताडाळी - ठाकराचा पाडा येथील मैदानावर पद्मश्री अनुप जलोटा यांच्या भजन-संध्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी शेकडो भाविक नागरिक अनुप जलोटा यांच्या



भजनाने मंत्रमुग्ध झाले होते.

या कार्यक्रम दरम्यान, गुरुकुलाच्या बांधकामासाठी मोठ्या संख्येने लोकांनी जमीन दान केली.तरअनुप जलोटा यांनी गुरुकुलाच्या बांधकामासाठी ११ लाख रुपयांची देणगी जाहीर केली.यावेळी त्यांनी सांगितले सांगितले की, स्वामीजी महाराज जेव्हा जेव्हा गुरुकुल बांधण्यासाठी आमंत्रित करतील त्या वेळी आनंदाने येऊ असे त्यांनी सांगितले. त्यांच्या उदारतेच्या भावनांचे उपस्थित नागरिकांनी स्वागत केले. या प्रसंगी स्वामी श्री गंभीरानंद सरस्वती यांनी अनुप जलोटा यांना जमीन दानाचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.प्रसंगी ब्रह्मचारी प्रेमस्वरूप,वृंदावन येथील स्वामी सुबोधानंद महाराज,अनुप जलोटा यांनी आश्रमाच्या त्रैमासिक मासिक गुरुकुल संदेशाचे प्रकाशन करून भक्तांन वाटप केले.

स्थानिक नगरसेवक निलेश चौधरी,हनुमान चौधरी यांनी जलोटा यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. माजी नगरसेवक संतोष शेट्टी,समाजसेवक विजयकुमार सिंह,श्याम विहारी मिश्रा, मल्लेशम कोंका,आनंद गुप्ता, मनोज सिंह ठाकूर व मान्यवर महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आपल्या राष्ट्राचा आणि संस्कृतीचा पाया धर्मग्रंथ आहे.तो टिकवणे आवश्यक आहे नाही तर आपली संस्कृती आणि धर्मग्रंथ कुठेतरी हरवून जातील.सध्या समाजात मूल्ये आणि नैतिकतेचा तीव्र अभाव दिसून येत आहे.त्यामुळे ते वाचवण्यासाठी गुरुकुलाची आवश्यकता आहे असे मत स्वामी गंभीरानंद यांनी यावेळी व्यक्त केले.जमीन दान व भजनाचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# भटक्या श्वानांसाठी अद्याप शेल्टर नाही

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांसाठी शेल्टर उभारण्याचे, वाढती संख्या रोखण्यासाठी निर्बिजीकरण करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, ठाणे महानगर पालिकेकडून अद्याप शेल्टर उभारण्यात आलेले नाहीत. तसेच, ठाणे महानगर पालिकेकडून एकही दवाखाना चालविला जात नसून निर्बिजीकरणही गेल्या वर्षभरापासून बंद आहे. शिवाय, निर्बिजीकरणाच्या नावाखाली रस्त्यावरून उचलले श्वान गायब होत असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

गेल्या अनेक दिवसांपासून ठाणे शहरातील भटक्या श्वानांचा प्रश्न जटील होऊ लागला आहे. भटक्या श्वानांना अन्न देणाऱ्या प्राणीमित्रांना



मारहाणही केली जात असून भटके श्वान बेपत्ता होत असल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भात ठाण्यातील प्राणीमित्र मनोज प्रधान यांच्या नेतृत्वाखाली एकवटले. रविवारी दमानी इस्टेट येथील दत्त मंदिरात श्री दत्तगुरूंना भटक्या श्वानांचे रक्षण करण्यासाठी या प्राणीमित्रांनी साकडे घातले. या प्रसंगी प्रधान पत्रकारांशी बोलत होते. मनोज प्रधान म्हणाले की, आपण स्वतः श्वानपालक आहोत. त्यामुळेच आपणाला प्राणीमित्रांच्या व्यथा माहित आहेत. सर्व प्राणीमित्र पदरचे पैसे खर्च करून भटके श्वान आणि भटक्या मांजरींना खाऊ-पिऊ घालत असतात. मात्र, समाजकंटकांकडून या प्राणीमित्रांना मारहाण करण्यात येत असते. श्वानदंशाबाबत बोलले जात असले तरी हजार श्वानांपैकी एक श्वान चावला और उर्वरित 999 श्वानांना दोष का देता? आज जी समस्या निर्माण झाली आहे. त्यास फक्त आणि फक्त ठाणे महानगर पालिकाच जबाबदार आहे. आपल्याकडे निर्बिजीकरणाकरणाची प्रक्रिया वर्षभरापासून बंद आहे. लसीकरण योग्यपद्धतीने होत नाही. श्वानांसाठी शेल्टर उभे करण्यात आलेले नाहीत. एकीकडे निर्बिजीकरण बंद असताना श्वान पकडून नेले जातात. मात्र, ते परत सोडले जात नाहीत. मग, त्यांचे काय केले जाते? याचा शोध घेण्याची जबाबदारी पालिकेची आहे.

# मुरबाडमध्ये “युगंधराला स्वरांजली” कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा दीप संपूर्ण मानवजातीसाठी तेवत ठेवणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुरबाड नगरपंचायत येथे “युगंधराला स्वरांजली” या शोकाकुल वातावरणातील श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ९ वाजता शांत, गंभीर आणि भक्तिभावाने पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे ठाणे जिल्हाध्यक्ष अण्णा साळवे यांनी केले आहे.

या संगीतमय श्रद्धांजली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार किसनजी कथोरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी जिल्ह्यातील मुख्य अभिवादक म्हणून मान्यवर नेते, सामाजिक कार्यकर्ते, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामानवाला आदरांजली अर्पण करणार आहेत.

महामानवाच्या महापरिनिर्वाणाचा हा दिवस संपूर्ण देशासाठी शोकाचा, स्मरणाचा आणि आत्मचिंतनाचा दिवस असतो. त्याच भावनेतून मुरबाडमध्येही बाबासाहेबांच्या चरणी शब्दांमधून, स्वरांमधून आणि अश्रूंमधून आदरांजली अर्पण करण्यात येणार आहे. या श्रद्धांजली कार्यक्रमात नव्या महापथावरील संवेदनशील आवाज असलेल्या शाहीर शीतल साठे आणि शाहीर सचिन माळी यांच्या शब्दांतून बाबासाहेबांना स्वरांजली वाहिली जाणार आहे. त्यांच्या सादरीकरणातून बाबासाहेबांचा त्याग, वेदना, संघर्ष आणि मानवमुक्तीचा विचार हृदयाला भिडणाऱ्या शब्दांतून व्यक्त केला जाणार आहे. “बाबासाहेब आज शारीरिक रूपात नाहीत, पण त्यांच्या विचारांचा सूर्य आजही अंधाराशी लढतो आहे. त्यांच्या स्मृतींना वंदन करणे हाच खरा कृतज्ञतेचा क्षण आहे,” अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली. तरी सर्व नागरिकांनी मौन, श्रद्धा आणि शिस्तीच्या वातावरणात उपस्थित राहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सामूहिक श्रद्धांजली वाहावी, असे आवाहन आण्णा साळवे यांनी केले आहे.

# मोहन हाईट्स येथे दत्त जयंती उत्सव



दै.ठाणेजीवनदीपवार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यात येत्या चार डिसेंबरला दत्त जयंती निमित्त विविध ठिकाणी श्रीदत्त जयंती उत्सव मोठ्या भक्तीभावात करण्यात येत असतो.धानिवली, सासणे,सरळगाव, मुरबाड शहरातील श्रीराम मंदिर तसेच अन्य ठिकाणी या दिवशी मोठा उत्सव साजरा होत असतो. मुरबाड शहरातील तोंडलीकरनगर येथील मोहन हाईट्स येथे गेले तीन वर्ष माजी नगराध्यक्ष तथा उद्योजक मोहन सासे व नगरसेविका मधुरा मोहन सासे यांच्या वतिने सुद्धा श्रीदत्त जयंतीचे आयोजन केले जात आहे.मुरबाड शहर व परिसरातील शेकडो नागरिक व भक्तजण या उत्सवात सामिल होत असतात. यावर्षीही उत्सवाचे आयोजन केले असून दिवसभर भक्तीपुर्ण कार्यक्रम ठेवले आहेत.चार तारखेला संध्याकाळी हरिपाठ, श्रीदत्त महाआरती, तसेच प्रसिद्ध गायक राजू गोडांबे यांचे सुश्राव्य भजनसंध्या व तदनंतर महाप्रसाद होणार असल्याची माहीती आयोजकांनी दिली असून सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक मोहन सासे व मधुरा सासे यांनी केले आहे.

# भारतीय संविधानाचा दागिना वाचवा



**- प्रा. ॲड. जयमंगल धनराज**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण येथे बौद्ध समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण आयोजित भारतीय संविधान अमृत महोत्सव दिन आणि महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय भवन खडकपाडा कल्याण (प) येथे रविवारी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड. घनशाम गायकवाड होते. तर प्रमुख वक्ते म्हणून माजी प्राचार्य ॲड. जयमंगल धनराज होते. यावेळी डॉ विकास जाधव यांनी संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन केले तर संस्थेचे सरचिटणीस मधुकर एन.साळुंके यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक मांडले.

संविधान ७५ वर्ष पूर्ण होतात, ही खूप ऐतिहासिक बाब आहे. अंमलबजावणी न करून सत्ताधारी संविधानाला निकामी करत आहेत. ज्यांच्या रक्तात समतेचा झरा आहे. ती जातीपातीचे बंधने तोडून, ती लोक आपल्या जवळ येऊन चळवळीला अधिक बळकट केल्या शिवाय राहणार नाही. 'भारतीय संविधान' हा 'दागिना' वाचवा, संविधानाचा दागिना वाचवला तर संपत्ती आणि दागिन्यांची रेलचल पुढच्या पिढीला देखिल आनंदाने उपभोगता येईल. त्या साठी आम्ही सदैव निरंतर जागरूकपणे प्रयत्नरत राहू, ही आपली जबाबदारी आहे. आपल्या सर्वांसाठी संविधान आधार आणि आमचं रक्षक आहे. ते संविधान वाचलं पाहिजे. असे प्रा.अँड.जयमंगल धनराज यांनी बोलतांना सांगितले.

यावेळी भारतीय संविधान व डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर कवी मिलिंद जाधव, कवी अक्षय भोईर यांनी कविता सादर केल्या. तर प्रेम जाधव लिखित एकपात्री नाटकाचे सादरीकरण सुवर्णा जाधव यांनी केले. तर रजनी कांबळे, प्रकाश सावंत यांनी गाणी सादर केली.

यावेळी बौद्ध समाज सांस्कृतिक मंडळाचे उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड. घनश्याम गायकवाड, सरचिटणीस मधुकर साळुंखे, खजिनदार सदानंद गायकवाड, चिटणीस वसंत कदम, ऍड चंद्रकांत बाविस्कर, सदस्य डॉ. भगवान प्रधान, भगवान नरवाडे, ऍड.ए. आर.कांबळे, ॲड. मनोहर केदारे, सुनीता साळुके, शैलेश दोंदे तर बौद्ध समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण अंतर्गत सांस्कृतिक कार्यकारी समिती व महिला समिती तर आदि उपस्थित होते.

# कल्याणमध्ये मीटरप्रमाणे रिक्षाला हरताळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण रेल्वे स्टेशन पश्चिम परिसरातून प्रवाशांच्या वाढत्या मागणीवरून उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि कल्याण रिक्षा चालक टॅक्सी महासंघाने मीटरप्रमाणे रिक्षा शहराच्या विविध भागात जाण्यासाठी सुरू करावी म्हणून परिवहन विभागाकडे मागणी केली होती. प्रवाशांच्या या वाढत्या मागणीचा आरटीओ अधिकारी आणि रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दखल घेत मीटर प्रमाणे रिक्षा सुरु केली होती. सुरूवातीचे दोन दिवस मीटरप्रमाणे प्रवासी वाहतुकीला प्रवाशांचा प्रतिसाद मिळाला.

उद्घाटन प्रक्रियेसाठी मीटरप्रमाणे रिक्षा चालकांची एक रांग निर्माण करण्यात आली होती. प्रवाशांची वाढती मागणी विचारात घेऊन रांगा वाढविण्याचा उपप्रादेशिक परिवहन विभागाचा विचार होता. परंतु, मीटर असलेल्या एका रांगेतील रिक्षांना प्रवाशांचा प्रतिसाद मिळत नसल्याने संबंधित रिक्षा चालकांनी नेहमीप्रमाणे शेअर पद्धतीने प्रवासी वाहतूक सुरू केली असल्याने मीटर प्रमाणे रिक्क्षा भाडे सेवेला हरताळ बसला असल्याचे दिसत आहे.

कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकात उतरल्यानंतर शहराच्या विविध भागात जाण्यासाठी अनेक वेळा रिक्षा मिळणे अवघड होते. शेअर पध्दतीने रिक्षेने प्रवासी वाहतूक केली तर त्यासाठी रेल्वे स्थानक भागातील रिक्षा वाहनतळावर ताटकळत राहावे लागते. अनेक प्रवासी मीटरप्रमाणे प्रवासी वाहतूक करावी म्हणून रिक्षा चालकांना सांगतात. पण, कल्याणमध्ये ही पध्दत नाही. त्यामुळे प्रवाशांचा हिरमोड होतो. अनेक जाणकार प्रवाशांनी कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाचा विचार करून गेल्या दहा दिवसापूर्वी कल्याणच्या उपप्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुळ यांनी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष प्रणव पेणकर, संतोष नवले आणि इतर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळून किमान दोन रांगा मीटरप्रमाणे प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

ही मागणी रिक्षा संघटनेचे अध्यक्ष प्रणव पेणकर यांनी तात्काळ मान्य केली होती. त्याप्रमाणे रिक्षा संघटनेच्या सुचनेप्रमाणे पहिल्या टप्प्यात एका स्वतंत्र रांगेतून पन्नास रिक्षा मीटरप्रमाणे प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या मीटरप्रमाणेच्या प्रवासी वाहतुकीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला की मग वाढीव रांगा तयार करायच्या असे नियोजन मीटरप्रमाणे प्रवासी भाडे शहराच्या विविध भागात जाण्यासाठी ३० ते ५० रूपये होते. याच मार्गावरील शेअर पध्दतीचे भाडे मात्र १५ ते २५ रूपये असते. त्यामुळे मीटरप्रमाणे दररोज प्रवासी वाहतूक केली तर आपणास मोठा भुर्दंड बसेल असा विचार करून मीटरप्रमाणे प्रवासी वाहतुकीसाठी इच्छुक असलेल्या प्रवाशांनी हळुहळू मीटरप्रमाणे रिक्षा प्रवासी वाहतुकीकडे पाठ फिरवली. दिवसभरात १० ते १५ प्रवासीपण मीटरप्रमाणे वाहतुकीसाठी तयार होत नसल्याने रिक्षा चालकांचे आर्थिक नुकसान होत होते. त्यामुळे रिक्षा चालकांनी पुन्हा नेहमीच्या रांगेतून शेअर पध्दतीने प्रवासी वाहतूक सुरू केली आहे. कल्याण डोंबिवलीतील बहुतांशी प्रवाशांची मानसिकता ही शेअर पध्दतीने प्रवासी वाहतुकीला आहे, असे जाणत्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. तर एक ते दोन किमी अंतरासाठी मीटर प्रमाणे भाड्याचा रिक्क्षा प्रवास न करता शेअर रिक्क्षा प्रवासाला प्राधान्य देत असले तरी मीटर प्रमाणे रिक्षा भाडे प्रवासी सुविधा बाबत लोकापर्यंत जनजागृतीमुळे पोहचू शकली नाही. तर दिपक हॉटेल परिसरातून तात्काळ रिक्षा नियोजित ठिकाणी जाण्यास मिळत असल्याने आणि वाहतूक पोलीसांच्या दुर्लक्षतेमुळे हा अनाधिकृत थांबा शेअर रिक्षा चालकांच्या पथ्यावर पडला असल्याचे काही रिक्षा प्रवाशांनी ओरड केली असून मीटर प्रमाणे रिक्षा संकल्पना ही झारीतील शुर्कचार्यामुळे अमंलात येणार नसल्याची चर्चा यानिमित्ताने रंगल्या असल्याचे दिसत होते.

# छत्रपतींचा पोवाडा गाणा-या बालशाहीराचा शैक्षणिक खर्च उचलणार

## शिवसेना पदाधिकारी रूपेश चंद्रकांत भोईर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महिलांसाठी आयोजित हळदी कुंकू समारंभात इयत्ता पहिलीत शिकणा-या एका लहान चिमुकल्यानी छत्रपतिचां पोवाडा गाऊन सर्वानाच आश्चर्य चकित केले. मुलाची प्रतिभा बघून शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) कल्याण विधानसभा सह संघटक रूपेश चंद्रकांत यांनी मुलाचा दहावी पर्यंत चा शैक्षणिक साहित्य चा खर्च उचलण्याची जवाबदारी घेतली . भोईर यांच्या घोषणेनंतर सर्वांनी भोईर यांचे कौतूक केले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) आणि मनसे तर्फे कल्याण च्या संयुक्त प्रभाग ( पॅनल ) क्रमांक नौ मध्ये आयोजित तीन दिवसीय हळदी कुंकू समारंभात महिलांनी भरपूर आनंद लुटला . विजेत्या





महिलांना पैठणी , पोहे हार , दागिने आणि लकी विजेता महिलांना सोन्याची नथ देण्यात आल्या . शुक्रवार ते रविवार पर्यंत आयोजित खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) कल्याण विधानसभा सह संघटक रूपेश चंद्रकांत भोईर आणि महिला उप शहर संघटक रूपाली भोईर होत्या. मनसे तर्फे उर्मिला तांबे आणि कपिल पवार सह आयोजक होते . ह्या कार्यक्रमात कल्याण पश्चिमेत टिळकनगर येथे राहणारा आणि इयत्ता पहिलीत शिकणा-या भाग्येश श्रीकांत जगदाळे यांनी छत्रपति शिवरायांचा पोवाडा गाऊन सर्वानाच मंत्रमुग्ध केले . लहान वयात पोवाडा गाणा-या भाग्येश चा शिक्षण कुठे थांबला नाही पाहिजे याचा विचार करून रूपेश चंद्रकांत भोईर यांनी उपस्थित शैकडों लोकांसमोर भाग्येश चा दहावी पर्यंत चा शैक्षणिक साहित्य चा खर्च उचलण्याची जवाबदारी स्वीकारण्याची ग्वाही दिली. सदर खेळ पैठणीचा आणि हळदी कुंकू समारंभात सलग तीन दिवस पॅनल क्रमांक नौ च्या महिलांनी शैकडों च्या संख्येत उपस्थित राहून कार्यक्रम ची शोभा वाढविली.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



**बुधवार
०३ डिसेंबर २०२५**

**मेष**
देवाचे आशीर्वाद मिळत राहतील आणि चांगली कामे कराल. मन भावनिकदृष्ट्या मजबूत असेल.व्यावसायिकांसाठीही दिवस खूप चांगला असेल.

**वृषभ**
तुमचा व्यवसाय वाढवण्यासाठी तुम्ही जे काही हाती घ्याल ते तुम्हाला नफा मिळवून देऊ शकते. कुटुंबातील एखाद्या सदस्याच्या आरोग्याबद्दल थोडेसे काळजी वाटू शकते.

**मिथुन**
तुम्ही तुमच्या आरोग्याची विशेष काळजी घ्याल. व्यावसायिकांचा दिवस सामान्य राहील; तुमच्या व्यवसायात कोणतेही बदल करणे टाळा. तुमचे काम वेळेवर पूर्ण कराल.

**कर्क**
बऱ्याच काळापासून कामाबद्दल चिंतेत आहात. सामाजिक किंवा राजकीय क्षेत्रात काम करत असाल तर तुम्हाला आदर आणि प्रतिष्ठा मिळू शकते.

**सिंह**
वस्तू खरेदी करण्यापूर्वी, आवश्यक वस्तूंची यादी बनवा आणि फक्त सर्वात आवश्यक असलेल्या वस्तू खरेदी करा. घरगुती खर्च तुमच्यासाठी मोठी समस्या बनू शकतात.

**कन्या**
नोकरी करणाऱ्यांसाठी चांगला दिवस असेल. अनावश्यक खर्च टाळा. काही कारणास्तव अस्वस्थ वाटत असेल, तर मुलांसोबत थोडा वेळ घालवल्याने शांती मिळेल.

**तुळ**
तुमच्या मुलाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. राजकारण्यांना जनतेचा पाठिंबा मिळेल. लोक तुमच्या कामाची प्रशंसा करतील. कौटुंबिक संबंध मजबूत होतील.

**वृश्चिक**
तुमच्या वैवाहिक जीवनात आनंद आणि सुसंवाद वाढेल. तुमच्या कुटुंबातील सर्वांना आनंदी ठेवण्यासाठी तुम्ही वचनबद्ध असाल, ज्यामुळे तुम्हाला चांगले वाटेल.

**धनु**
बऱ्याच काळापासून एखाद्या गोष्टीचा त्रास आहे त्यावर उपाय सापडेल. तुमच्याबद्दल बोलल्या जाणाऱ्या लोकांच्या मतांमुळे आणि शब्दांमुळे त्रास होऊ शकतो.

**मकर**
विद्यार्थी आज त्यांच्या अभ्यासाबद्दल उत्साहित असतील आणि अभ्यासात जास्त वेळ घालवतील. तुमचे बोलणे कठोर असू शकते, परंतु इतरांबद्दल प्रेम जपा.

**कुंभ**
पोटाच्या समस्या असलेल्यांनी तेलकट पदार्थ टाळावेत. आज तुम्हाला तुमच्या मुलांकडून आनंददायी अनुभव येतील. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत सापडतील.

**मिन**
तुम्हाला एका महत्त्वाच्या चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळेल, ज्यामध्ये तुम्ही लक्षणीय सहभागी व्हाल. तुम्ही कोणत्याही कामाचा काळजीपूर्वक विचार करावा.

# १० वर्षांनंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तीन वेळा बटन दाबून मतदान !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूरः** एरवी नगर परिषद किंवा इतर निवडणुक म्हटली की एका मतदान यंत्रावर एक बटण दाबून मत द्यायचे असते. मात्र यंदाची कुळगाव बदलापूर नगर परिषदेची निवडणूक वेगळी ठरली आहे. यंदाच्या निवडणुकीत द्विसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे एका प्रभागात दोन सदस्यांना मत द्यावे लागणार आहे. सोबतच थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडीमुळे नगराध्यक्षाच्या उमेदवारालाही मत द्यावे लागणार आहे. त्यामुळे मतदान केंद्रावर उपलब्ध एक किंवा दोन मतदान यंत्रावर तीन वेळा बटणे दाबावी लागणार आहेत. मतदारांना राजकीय पक्ष, अपक्षासह यापैकी कुणीही नाही (नोटा) हे पर्याय असतील. नगर परिषद आणि निवडणूक अधिकाऱ्यांनी याबाबत जनजागृतीही केली होती. अधिकाधिक मतदारांनी मतदान करावे असे आवाहन निवडणूक निर्यण अधिकाऱ्यांनी केले आहे.

कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी मंगळवारी होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा, पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. शांततेत मतदान प्रक्रिया पार पडावी यासाठी शहरात तब्बल एक हजाराहून अधिक पोलिस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. सोमवारी कर्मचाऱ्यांना मतदान केंद्र निहाय साहित्य वाटप करण्यात आले. बदलापुरात उमेदवार पळवापळवीपासून सुरू झालेला संघर्ष पैसे वाटपासून हाणामारीपर्यंत पोहोचला होता. त्यातच ऐन दोन दिवसांपूर्वी काही प्रभागात मतदानाला स्थगिती मिळाल्याने अनेकांना धक्का बसला. मात्र तरीही मंगळवारी नगराध्यक्ष पद आणि ४४ जागांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

शेजारच्या अंबरनाथ नगर परिषदेची निवडणूक प्रक्रिया पुढे ढकलली गेल्याने संपूर्ण पोलिस बळ बदलापूरच्या मतदानाकडे वळवली गेली आहे. या बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दलाचे दोन वरिष्ठ अधिकारी, ५० कर्मचारी, ५५० पोलिस कर्मचारी, पोलीस उपनिरिक्षिक पदाचे ६० अधिकारी, तीन सहाय्यक पोलिस आयुक्त, १० सहाय्यक पोलिस निरीक्षक आणि तब्बल ४५ वरिष्ठ पोलिस निरीक्षक तैनात आहेत. तसेच २५० होमगार्ड, पेट्रोलिंगसाठी २१ कर्मचारी आणि शहरातील ३२ संवेदनशील ठिकाणी एक अधिकारी व पाच पोलिसांची विशेष उपस्थिती असेल, अशीमाहिती परिमंडळ चारचे पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली. निवडणुकीसाठी मतदानाचा टक्का वाढवा यासाठी निवडणूक यंत्रणांनीही गेल्या महिनाभरात अनेक जनजागृती मोहिमा राबवल्या.

# नवी मुंबईचा पुढील महापौर भाजपाचाच ! गणेश नाईकांचे सूचक वक्तव्य

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मी विश्वासाने सांगतो नवी मुंबईचा महापौर हा भाजपचाच होणार यात दुमत नाही. नवी मुंबईच्या लोकांना मी २००० साली बोलली होतो घरपट्टी, पाणी पट्टी वाढणार नाही. आता पुन्हा सांगतो आणखी २० वर्ष घरपट्टी पाणी पट्टी वाढू देणार नाही. काही लोक येतील आम्ही हे केले, आम्ही ते केले सांगतील. जे काम नाही केले ते देखील सांगतील. काहींनी लोकांना गटारात बुडविले तरी पाट्या लावतात. लोकांना दारिद्र्याच्या खोलात नेणारे लोक पाट्या बहादुरी करतात. गेल्या २५ वर्षात शहरातील मालमत्ता कर, पाण्याचे दर मी वाढू दिले नाहीत. यापुढे २० वर्ष वाढू देणार नाही' - गणेश नाईक**

ठाणे : नगरपालिका निवडणुकांनिमित्त सध्या राज्यात भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना या दोन पक्षांत कलगीतुरा रंगलेला पहायला मिळाला. तळ कोकणात तर नारायण राणे यांचे पुत्र आमदार निलेश राणे यांनी भाजपविरोधात जोरदार मोहीम उघडल्याचे चित्र होते. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या निकटवर्तीयांच्या घरात शिरुन निलेश राणे यांनी पैसेही पकडून दिले. हा सामना एकीकडे टोक गाठत असताना वनमंत्री गणेश नाईक यांचे एक वक्तव्य सध्या चर्चेत आले आहे.

नवी मुंबई महापालिका निवडणुकांच्या तोंडावर वनमंत्री गणेश नाईक यांनी पुढील २० वर्षे नवी मुंबईकरांवर कोणत्याही प्रकारची करवाढ लादली जाणार नाही अशी घोषणा केली आहे. २००० साली महापालिका निवडणुकांना सामोरे जात असताना नाईक यांनी पहिल्यांदा अशी घोषणा केली होती. या घोषणेचा पुनरुच्चार करत असताना नाईक यांनी नवी मुंबईचा महापौर भाजपचाच होईल असा दावाही एका जाहीर सभेत केला. नवी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीत भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना हे दोन पक्ष एकमेकांसमोर असतील असे एकंदर चित्र आहे. या दोन पक्षांतील नेत्यांमध्ये स्थानिक पातळीवर विस्तवही जात नाही. याशिवाय वनमंत्री गणेश नाईक यांनी यापूर्वीही शिंदे यांच्यावर प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष टिकेचे आसूड ओढले आहेत. या पार्श्वभूमीवर कोपरखैरणे येथील एका कार्यक्रमात बोलताना नाईक यांनी शहराचा पुढील महापौर हा भाजपाचाच असेल असा दावा करत पुन्हा एकदा शिंदे यांना डिवचले आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी नवी मुंबईत पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासाठी उपस्थित असलेले शिंदे यांनी नवी मुंबईत यंदा आनंद दिघे यांना अभिप्रेत असलेला भगवा फडकायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. महायुतीचे आम्ही पाहून घेऊ. त्या आधी भगवा फडकविण्यासाठी तुम्ही कामाला लागा असेही शिंदे म्हणाले होते. या पार्श्वभूमीवर नाईक यांनी शहराचा महापौर भाजपचा असेल असा दावा करत असताना आगामी निवडणुकीतही 'करवाढ मुक्त नवी मुंबई'चा नारा दिला आहे.

# विठ्ठलवाडी स्थानकात बाल अपहरणाचा प्रयत्न

## प्रवाशांच्या तक्रारीवरून भुरट्या चोराला अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - मध्य रेल्वेच्या विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकात शनिवारी दुपारी सात ते १० वयोगटातील दोन मुली आणि एक मुलगा यांना मी तुमचा मामा आहे. तुम्हाला चॉकलेट खाण्यास देतो असे सांगून या मुलांचे अपहरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका भुरट्या चोराला प्रवाशांनी पकडले. या मुलांना त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. त्यानंतर विठ्ठलवाडी रेल्वे पोलीस आणि मुलांच्या आईने या भुरट्या चोराला कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात आणले. तेथे मुलांच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी या भुरट्या विरूध्द गुन्हा दाखल केला.

सुरजकुमार विजयनारायण गुप्ता (३३) असे भुरट्या चोराचे नाव आहे. तो अंबरनाथ येथील संघटन चौक भागात राहतो. मनीषा संजय वर्मा असे तक्रारदार महिलेचे नाव आहे. त्या पतीसह विठ्ठलवाडी पूर्व भागात कुटुंबीयांसह राहतात. त्यांचे पती शिंपी आहेत. मनीषा गृहसेविका म्हणून काम करतात. या महिलेची तिन्ही मुले विठ्ठलवाडी येथील गोदाताई परूळेकर विद्यालयात शिक्षण घेतात. सोमवार ते शनिवार मुले शाळेत असतात. सुट्टी असली की मुले घरी मस्ती करतात, घराबाहेर पडतात म्हणून मनीषा सुट्टीच्या दिवशी मुलांना आपल्या कामाच्या ठिकाणी घेऊन जातात.

**मनीषा यांचे पती विठ्ठलवाडी शांतीनगर भागात शिंपी म्हणून काम करतात. त्यांना दररोज दुपारी भोजनाचा डबा पोहचविण्याचे काम पत्नी मनीषा करते. शनिवारी मुलांच्या शाळेला सुट्टी होती. पतीला दुपारचा भोजनाचा डबा द्यावयाचा होता. म्हणून मनीषा यांनी आपल्या तिन्ही मुलांना सोबत घेतले. त्या विठ्ठलवाडी रेल्वे स्थानक येथे गेल्या. तेथे मुलांना काही थांबविले आणि त्या पतीला शांतीनगर भागात भोजनाचा डबा देण्यास गेल्या. तेथून आल्यावर त्या मुलांना आपल्या कामाच्या ठिकाणी घेऊन जाणार होत्या.**

# पनवेल तालुक्यातील ग्रामीण रस्ते कात टाकणार

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरुस्तीला वेग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल, ता. २ (बातमीदार)** तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. याच अनुषंगाने शेतकरी कामगार पक्षाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रस्ते दुरुस्तीसाठी पाठपुरावा केला होता. त्यानुसार महत्त्वाच्या रस्त्यांच्या दुरुस्तीला तातडीने मंजुरी दिली आहे.

पनवेल तालुक्यातील अनेक गावांमधून रस्त्यांच्या खराब अवस्थेबाबत सातत्याने तक्रारी येत होत्या. खड्डेमय रस्त्यांमुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाणे, शेतकऱ्यांना माल बाजारात नेणे तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसाळयानंतर रस्त्यांची अवस्था आणखीच बिकट झाली होती. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल ढवळे यांनी ग्रामीण रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत पाठपुरावा केला होता. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने चिपळे, मोहो, विहिघर, शेडंग, बेलवली आणि नेरे रस्त्याच्या दुरुस्तीली मंजुरी दिल्याने ग्रामीण जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे. वाहतुकीचा वेग वाढेल, शेतमाल वाहतूक सुलभहोईल, विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाची समस्या कमी होईल. त्यामुळे आगामी काही महिन्यांत रस्ते नव्या रूपात दिसतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




# मुंबई विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन कार्यक्रमात जीवनदीपच्या विद्यार्थ्यांची बाजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : मुंबई विद्यापीठाने सुरू केलेला तसेच विद्यार्थी विकास विभागातर्फे राबविण्यात येणारा अविष्कार संशोधन कार्यक्रम हा सोमवार दिनांक ०१-१२-२०२५ रोजी बी.के.बिर्ला महाविद्यालय येथे पार पडला. या अविष्कार कार्यक्रमांमध्ये जीवनदीप महाविद्यालयातील विविध विभागाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता यामध्ये विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांनी मोलाची भूमिका बजावली विद्यार्थ्यांना त्यांच्या विभागातील प्राध्यापकांनी स्पर्धेकरता पोस्टर बनवणे, ppt प्रेझेंटेशन तयार करणे व इतर कामांमध्ये सहकार्य करत त्यांच्याकडून योग्य प्रकारे सादरीकरण करण्यासाठी रंगीत तालीम करून घेतली.

विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी सदर कार्यक्रम हा राबवण्यात येतो .कार्यक्रम स्थळी विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध संशोधन अहवाल पोस्टर स्वरूपात सादर केले व पंचांनी त्यांची पाहणी करून पावर पॉइंट प्रेझेंटेशन करता पुढे सत्रात निवड केली. यामध्ये महाविद्यालयातील मानव्यविद्या शाखेअंतर्गत पदवी स्तरावर संशोधक विद्यार्थी माधवी माळवे

मार्गदर्शक डॉ. मनीषा काकडे वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा संशोधक विद्यार्थी गायकर शुभम, गायकर मानसी मार्गदर्शक प्रा. मयुरी कांबळे या तीघांची विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या फेरीसाठी निवड झाली आहे . महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंडे, प्राचार्य डॉ.अशोक वाघ उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे व संशोधन समिती यांनी विद्यार्थ्यांचे या घवघवीत यशाबाबत कौतुक केले आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अतिरिक्त आयुक्त धिरज चव्हाण यांनी सोमवार दि. 01 रोजी उल्हासनगर महापालिका परिवहन सेवेच्या बसद्वारे प्रवास केला असून नागरिकांच्या समस्या समजून घेतल्या. यावेळी रूट क्रमांक 101 शहाड रेल्वे स्टेशन ते कैलाश कॉलनी पर्यंत व्हाया श्रीराम चौक ह्या बस मध्ये साफसफाई नसल्याचे निदर्शनास आले बस मध्ये नाम फलक बंद असल्याचे तसेच अग्निशामक जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. दरम्यान परिवहन विभागास वरील त्रुटींची पूर्तता करण्याचे आदेश देण्यात आले असून संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करून नोटीस देण्यास सांगितले आहे, अशी माहिती उल्हासनगर पालिका प्रशासनाने दिली आहे.**


# ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व्यवस्थेच्या गुणवत्तेला मजबूती

## जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, ता. २ :** जलजीवन मिशनच्या उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी होऊन ग्रामीण भागातील जलस्रोतांची शाश्वतता, सुरक्षितता आणि पाणीपुरवठा व्यवस्थेची गुणवत्ता अधिक मजबूत होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास जिल्हा परिषद प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे. ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

हा प्रशिक्षण कार्यक्रम हिमालय इन्स्टिट्यूट फॉर एन्व्हायर्नमेंट ॲण्ड डेव्हलपमेंट, डेहराडून (उत्तराखंड) या मुख्य संसाधन केंद्रामार्फत घेतला जात आहे. राज्य स्तरावरील या मान्यताप्राप्त संस्थेच्या तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जात असून, संपूर्ण कार्यक्रम जिल्हा परिषद यांच्या समन्वयाने राबविण्यात येत आहे. प्रशिक्षण क्लस्टर लेव्हलवर आयोजित करण्यात आले आहे. यामुळे प्रत्येक क्षेत्रातील ग्रामपंचायतींना जवळच्या ठिकाणी प्रशिक्षण घेता येणार आहे. भारत सरकारने २०१९ मध्ये सुरू केलेले जलजीवन मिशन हे ग्रामीण भारताच्या पाणीपुरवठा क्षेत्रातील क्रांतिकारक अभियान आहे. याचा



उद्देश ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक घरगुती नळ कनेक्शनच्या माध्यमातून सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे. दरम्यान, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सतत उपलब्धता, सार्वजनिक आरोग्यात सुधारणा, महिला व मुलींवरील पाणी भरण्याचा भार कमी होणे, सामाजिक-आर्थिक विकासास गती, ग्रामपंचायती आणि स्थानिक समितींचा सक्रिय सहभाग यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे आहे.

ठाणे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमधील प्रत्येकी पाच प्रतिनिधी या प्रशिक्षणात सहभागी होणार आहेत. याप्रमाणे एकूण दोन हजार १५५ प्रशिक्षणार्थी आहेत. हा प्रशिक्षण कार्यक्रम सोमवारी (ता. १) ते ३० डिसेंबर या कालावधीत एकूण ३५ बॅचेसमध्ये पार पडणार आहे. प्रशिक्षण क्लस्टर लेव्हलवर आयोजित केल्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील ग्रामपंचायतींना जवळच्या ठिकाणी प्रशिक्षण घेता येणार आहे.

प्रभावी पाणी व्यवस्थापनासाठी जलस्रोतांची सुरक्षितता आणि शाश्वतता एकत्रितपणे साध्य करणे. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांची संस्थात्मक क्षमता वाढविणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणाद्वारे समिती सदस्यांना पाणीपुरवठा योजनांचे नियोजन, अंमलबजावणी, देखभाल, स्रोत बळकटीकरण, जल गुणवत्तेची काळजी आणि दीर्घकालीन शाश्वतता याबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

# राज्यस्तरीय वुशू चॅम्पियनशिप स्पर्धेत भिवंडीतील विद्यार्थ्यांनी मिळवली दहा पदकं

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी) :** भिवंडी शहरातील सिटी वुशू असोसिएशन तर्फे धुळे जिल्ह्यातील गोंदुर येथे नुकतेच पार पडलेल्या २२ वी. सब-ज्युनिअर व २३वी ज्युनिअर महाराष्ट्र राज्यस्तरीय वुशू चॅम्पियनशिप स्पर्धेत भिवंडीतील प्रशिक्षक केशव सिल्वेरी यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करीत एक सुवर्ण पदक,तीन रजत पदक,सहा ब्राँझ पदक अशा दहा पदकांची लयकुट केली आहे. त्यामुळे मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले आहे. अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत सरिता खडकेकामी - सुवर्ण पदक,स्पृहा खडके, मुस्कान लालचंद सरोज, अनुराधा हरिंदर गिरी - रजत पदक तर बबीता खडकेकामी,प्रियांका बिजय झा,आशा जितेंद्र यादव, हीत प्रमोद म्हात्रे,मिहिर टेंबे,साइमाहिमा दासरी यांनी ब्राँझ पदक पटकावले आहेत. भिवंडी सिटी वुशू असोसिएशन तर्फे या स्पर्धेत शहरातील १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत चमकदार कामगिरी केल्याबद्दल असोसिएशनचे अध्यक्ष नरेश जंपाल यांनी सर्व पदक विजेत्या खेळाडूंसह सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आर्थिक दुर्बल घटकांना सवलतीच्या दरात मतदार याद्या द्या - भाजपाची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** अनुसूचित जाती, जनजाती, आर्थिक दुर्बल घटकांच्या उमेदवार, नागरिकांना सवलतीच्या दरात मतदार यादी देण्याची मागणी भारतीय जनता पार्टी अनुसूचित मोर्चाचे कल्याण जिल्हा सरचिटणीस राम बनसोडे यांनी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे. राज्यात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये नगरपालिका, नगरपरिषदा महानगरपालिकेच्या निवडणूकीचा कार्यक्रम सुरू आहे. या सर्व निवडणूक पॅनल पध्दतीने होत असताना राज्यात २,३,४ व अन्य प्रभाग समाविष्ठ पॅनल पध्दतीने होत असल्याने महानगरपालिका क्षेत्रात ५० हजार मतदारांचा एक पॅनल तयार करून निवडणूक जाहिर झाल्या आहेत. त्यामुळे प्रथमच पॅनल पध्दतीने आरक्षीत मतदार संघातील ४ सदस्य पॅनल पध्दतीला सामोरे जावे लागत आहे. महानगरपालिकेने मतदार याद्या तयार करून सुचना हरकतीसाठी मुदत देण्यात आली आहे. या सर्व मतदार यादया प्रभागनिहाय प्रभागक्षेत्र कार्यालयात शुल्क भरून घेण्याची जाहिर सुचना केली आहे. परंतू प्रथमच ४ सदस्य पॅनल निवडणूकीसाठी ५० हजार मतदारांची यादीचे शुल्क पानाप्रमाणे ठरवून ते प्रति पान २ रू. आकारणी केल्याने त्याची किंमत १२ हजार, १० हजार असून रूपये शुल्क भरून घेण्यास सुचना काढल्या आहेत. अनुसूचित जाती, जनजाती व दुर्बल घटकांसाठी कसल्याही प्रकारची सुट किंवा सवलत देण्यात आली नाही. त्यामुळे आरक्षीत प्रभागातील उमेदवारांना हजारो रूपये खर्च करून यादी घेणे परवडत नाही. एकीकडे आरक्षीत प्रभागात अनामत रक्कम भरण्यास सुट आहे मग यादयाही सवलतीच्या दरांत मिळणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ४६ अन्वये अनुसूचित जाती, जनजाती, आर्थिक दुर्बल घटकांवर सामाजिक अन्याय व आर्थिक शोषण होणार नाही याची खबरदारी घेणे हे शासनाचे कर्तव्य असून भारतीय संविधानिक अधिकार प्राप्त प्रवर्ग आहे. म्हणून अनुसूचित जाती, जनजाती, आर्थिक दुर्बल घटकांना नाममात्र शुल्क आकारून यादया मिळवून देण्यात याव्या. यामुळे अनुसूचित जाती, जनजाती, आर्थिक दुर्बल घटकांना होणाऱ्या अन्यायापासून व आर्थिक शोषणापासून न्याय मिळवून देण्याची मागणी बनसोडे यांनी राज्य निवडणूक आयुक्तांकडे केली आहे.

# भिवंडी कारखान्यातील कचऱ्याला आग


## मानसरोवर वस्तीतील नागरिकांना विषारी धुराचा त्रास

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

भिवंडी, ता. २ (वार्ताहर): भिवंडी शहर यंत्रमाग व्यवसायासोबतच प्लॅस्टिक मणी बनवणाऱ्या मोठ्या कारखान्यांसाठी ओळखले जाते. शहरातील शांतीनगर, नवीबस्ती या भागात मोठ्या प्रमाणावर असलेल्या अशाच एका प्लॅस्टिक मणी कारखान्याच्या भंगार कचऱ्याने पेट घेतल्यामुळे निर्माण झालेल्या विषारी धुरामुळे नजीकच्या नागरी वस्तीतील नागरिकांना गंभीर त्रास जाणवत आहे. नवीबस्ती येथील गोविंद कंपाउंड भागात प्लॅस्टिक मणी कारखान्यातून निघणारा भंगार कचरा परिसरातील डोंगराजवळील मोकळ्या जागेत टाकला जातो. येथील कचऱ्याने मंगळवारी (ता. २) दुपारी १२ वाजताच्या सुमारास पेट घेतला. पाहता पाहता या आगीने मोठा आगडोंब उडाला आणि त्याचा उग्र व विषारी धूर आकाशात पसरला. या आगीची माहिती भिवंडी अग्निशमन दलाला न देण्यात आल्याने ही आग विझण्याची वाट येथील नागरी वस्तीतील लोकांना पाहावी लागली. परिसराच्या अगदी जवळच मानसरोवर ही नागरी वस्ती आहे. या वस्तीतील इमारतींमध्ये धुराचे लोट शिरल्याने अनेकांना श्वसनाचा आणि खोकल्याचा त्रास जाणवू लागला होता. स्थानिक रहिवाशांनी तक्रार केली की, नवीबस्ती येथील निर्जनस्थळी अनेक वेळा प्लॅस्टिक मणी कारखान्यातील कचरा जाळला जातो, ज्यामुळे मानसरोवर येथील नागरिकांना वारंवार धुराचा त्रास होत असतो.

### ■ तक्रारींनंतरही दुर्लक्ष

**अनेक तक्रारी भिवंडी पालिका पर्यावरण विभाग आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार केल्या गेल्या आहेत, तरीही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. "येथील प्लॅस्टिक मणी बनविणाऱ्या कारखान्यांवर पालिका पर्यावरण विभाग आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ नक्की कधी कारवाई करणार," असा संतप्त सवाल सीमा माहेश्वरी यांनी उपस्थित केला आहे.**



# वासिंद येथे कर्करोग तपासणी व जनजागृती शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामपंचायत वासिंद यांच्या संयुक्त विद्यमाने वासिंद पूर्वेकडील रायकर पाडा ( जिजामाता नगर ) येथे सोमवार दिनांक 29/ 11/ 25 रोजी कर्करोग तपासणी व जनजागृती शिबिर आयोजित केले होते सदर शिबिरासाठी डॉ. सचिन घोलप( स्त्रीरोग तज्ञ) डॉ. सुचिता गोरे( पर्यवेक्षक डॉ. सुरेखा मनसुख (मानसशास्त्र तज्ञ) डॉ. नेहा वेखंडे (दंतरोग तज्ञ) डॉ. विश्वेता धरणे (वैद्यकीय अधिकारी) डॉ. स्नेहल खरटमोल (वैद्यकीय अधिकारी) डॉ. योगिनी निरवारे आधी तज्ञ डॉक्टरांकडून या कर्करोग तपासणी शिबिरात 110 लाभार्थ्यांची कर्करोग तपासणी करण्यात आली यावेळी वासिंद ग्रामपंचायत सरपंच राजेंद्र म्हसकर, वासिंद प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली शेंडगे तालुका विस्तार अधिकारी जयराम नागवंशी वासिंद प्राथमिक केंद्राचे कर्मचारी व ग्रामपंचायत कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते या आयोजित केलेल्या तपासणी शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपली तपासणी करून घेतली व आयोजकांचे आभार मानले.



# खावडा वीज वाहिनी बाधीत शेतकऱ्यांना १२ हजार रुपये प्रती चौरस मीटर दर देण्याची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील खावडा विज वाहीनीसाठी जमीन देणाऱ्या बाधीत शेतकऱ्यांना १२ हजार रूपये प्रति चौरस फुट नुकसान भरपाईचा एकसमान दर देण्याची मागणी ठाणे जिल्हा विविध प्रकल्पग्रस्त हीतकारी कृती समीतीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली.

मंगळवारी ही पत्रकार परिषद समितीचे मुख्य समन्वयक राजन गांवड, भगवान सांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कुरुंद येथील ग्रामपंचायत कार्यालयातील सभागृहात घेण्यात आली यावेळी परिसरातील प्रकल्पग्रस्त बाधीत शेतकरी उपस्थित होते. यावेळी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या आर्थिक विकासाचा कणा असलेला कोकणातील अल्पभूधारक शेतकरी विविध प्रकल्पामुळे बाधीत होऊन भुमीहीन होत असुन दोन्ही टॉवरमधील तारेचा कॉरीडॉरचा समान भाव शेतकऱ्यांना मिळावा.अशी मागणी भगवान सांबरे यांनी



तर मुंबईतील मराठी माणसांप्रमाणे विविध प्रकल्पांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी नष्ट होत असुन गॅस, तेल लाईन, विज लाईन यासाठी "वापर हक्क" कायद्याचा वापर व्हायला पाहिजे तो होताना दिसत नाही तसेच "वापर हक्क" कायदा अद्ययावत करून त्यामार्फत शेतकऱ्यांना लाभ देण्याची मागणी करण्यात आली. खावडा विज वाहीनी सोबत या आगोदरच्या प्रकल्पांची माहीती घेऊन समीती लढा देणार असुन वेळ पडल्यास सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे राजन गांवड यांनी सांगितले तर निवडुन दिलेले लोकप्रतिनिधी, व शासकीय अधिकारी प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांकडे लक्ष देत नसल्याने प्रकल्पग्रस्त कृती समीती व उपस्थित बाधीत शेतकऱ्यांनी यावेळी संताप व्यक्त केला. तर खावडा विज वाहीनी बाबत भिंवडी प्रातं कार्यालयात बैठका घेऊनसुध्दा बैठकीचा अहवाल शासनापर्यंत पोहचला नसुन सवीस्तर इतीवृत्ताची प्रत मिळाली नसल्याने कृती समितीने नाराजी व्यक्त केली. तर कोकण आयुक्त, जिल्हाधिकारी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष आण्णासाहेब बनसोडे यांना निवेदन देऊन खावडा विज वाहीनी संदर्भात भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांना ३ हजार ३०० रुपयांऐवजी १२ हजार रुपये प्रति चौरस फूट भरपाई दर देण्याची मागणी करण्यात आल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले तर बाधीत शेतकऱ्यांचे प्रश्न न सुटल्यास न्यायीक लढयासह रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन उभारावे लागेल असा इशाराही देण्यात आला यावेळी तळवली सोसायटीचे सभापती काशीनाथ शेलार, परिसरातील प्रकल्पग्रस्त शेतकरी कुणाल पाटील, नारायण पाटील, रोहीदास पाटील, मनोज भोईर, बळीराम राऊत, भास्कर पाटील सह इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईशा नेत्रालयाच्या वतीने जनजागृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : लहान मुलांच्या मनातील असलेली डोळयांची भिती दूर करण्यासाठी ईशा नेत्रालय खडकपाडा कल्याण पश्चिम यांच्या वतीने लहान मुलांनसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कल्याण मधील पियुष डान्स अकादमीच्या वतीने यावेळी डान्स कार्यक्रम सादर करण्यात आला.

डॉ पुष्पांजली रामटेके यांनी सांगितले की डोळयांच्या उपचार बाबत लहान मुले घाबरत असतात. त्यांना वाटते कि डोळयाला काही इजा झाल्यास डॉक्टर डोळया मध्ये इंजेक्शन मारतात म्हणून लहान मुले सहजासहजी डोळयांच्या हॉस्पिटलमध्ये जाण्यास घाबरत. म्हणून हि मनातील भिती कायमची दूर करण्यासाठी खास करून खडकपाडा येथील ईशा नेत्रालयात कार्यक्रम ठेवण्यात आला होता. लहान मुलांनी डोळयांचे हॉस्पिटल बघीतले आहे तसेच पियुष डान्स अकादमी यांनी सहकार्य केले आहे. मुलांची व पाल्याची मोफत नेत्र तपासणी करण्यात येईल असे ईशा नेत्रालय कडून सांगण्यात आले.

यावेळी पियुष डान्स अकादमीचे पियुष सेन यांनी सांगितले की, मी अनेक कार्यक्रम डान्सच्या माध्यमातून केले आहेत, परंतु ईशा नेत्रालयाचा कार्यक्रम खूप छान होता. लहान मुलांच्या मनातील डोळयाची भिती निर्माण झाली होती ती ह्या कार्यक्रमातून दूर होईल. अशा कार्यक्रमातून जनजागृती होणे गरजेचे आहे. मुलांनी आठ ते दहा तास झोप घेणे आवश्यक आहे. तसेच पालेभाज्या खाणे हि गरजेचे आहे. तसेच कोवीड पासून लहान मुले जास्त मोबाईल कडे आकर्षित झाले आहेत व त्याचा परिणाम डोळयांनवर झाला आहे. आता तरी लहान मुलांना मोबाईल पासून दूर ठेवले पाहिजे असे पियुष सेन यांनी सांगितले.

# भिवंडीचे माजी नगरसेवक साईनाथ पवार यांना मातृशोक

दैठाणेजीवनदीपवार्ता



**भिवंडी** : भिवंडी महानगरपालिकेचे माजी नगरसेवक साईनाथ पवार यांच्या मातोश्री व भिवंडीभूषण स्व. रंगराव विठोबा पवार यांच्या पत्नी सरस्वती पवार ( वय -72) यांचे अल्पशा आजाराने सकाळी निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात दोन मुले चार मुली सुना जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

भिवंडीभूषण स्व.रंगराव पवार यांच्या प्रगतीमध्ये पत्नी म्हणून सरस्वती यांनी मोलाचा वाटा होता. तर आपल्या मुलांवर सामाजिक व धार्मिक कार्याचे संस्कार करुन प्रगत केले.

त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच शहरातील राजकीय पक्षाचे पदाधिकारी, नगरसेवक मान्यवर नागरिकांनी कामतघर भारत कॉलनी येथील निवासस्थानी अंत्यदर्शन घेत साईनाथ पवार व कुटुंबीयांचे सांत्वन केले आहे.त्यांच्यावर रात्री गौरीपाडा येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# भाजप सर्वोच्च जिल्हाध्यक्षांसह दोन माजी नगरसेवकांसमवेत कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली(शरद शहाणे)** : मनसेचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रकाश भोईर यांच्यासह त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका सरोज भोईर आणि माजी नगरसेवक सुदेश चुडनाईक यांनी कार्यकत्यासह रविवारी भाजपात प्रवेश केला. या तीन माजी नगरसेवकांच्या प्रवेशाने मनसेला राम राम दिला आहे

डोंबिवली पश्चिमेतील उमेशनगर मैदान येथे रविवारी हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. मागील रविवारी अनमोल नगरी ते साईनगर परिसरात पाण्याची पाईपलाईन टाकण्याचा कार्यक्रम पार पडला होता. या कार्यक्रमात चव्हाण यांनी भोईर देखील लवकरच भारता माता की जय, सारख्या घोषणा देतील असे वक्तव्य करून भोईर भाजपात



येणार असल्याचे संकेत दिले होते. रविवारी ते वाक्य सत्यात उतरले .

रविंद्र चव्हाण म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविण्यासाठी त्यांचे प्रयत्न पाहता मोठय़ा प्रमाणात येथे प्रवेश होत आहे. प्रकाश भोईर, सरोज भोईर आम्ही सर्वजण येथे काम करत आहोत. दोघेही वेगवेगळय़ा पॅनलमध्ये गेल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. म्हणून प्रकाश भोईर यांच्यासह कार्यकर्त्यांनी भाजपात येण्याचा विचार केला आहे. त्याप्रमाणो त्यांनी भाजपात प्रवेश केला आहे.

प्रकाश भोईर म्हणाले, कोणत्याही पदाधिकाऱ्याला काम करण्यासाठी कार्यकर्त्यांचे पाठबळ लागते. परंतु ते पाठबळ नसल्याने भाजपात जाण्याचा निर्णय घ्यावा लागला.

# ग्रामपंचायत कार्यालयात पोलिस पाटील व अन्य एक शासकीय कर्मचारी यांना खोली उपलब्ध करा

## शहापूर गटविकास अधिकारी यांचे ग्रामपंचायत विभागांना कार्यवाहीसाठी पत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



भाजीपाला पिकांच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांची लगबग

**शहापूर ग्रामीण (नरेंद्र पाटील)** : पोलिस पाटील व अन्य एक शासकीय कर्मचारी यांना कार्यालयीन वापरासाठी एक खोली उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामपंचायत विभागांकडून कार्यवाही व्हावी यासाठी ग्रामपंचायत विभागांना गटविकास अधिकारी यांच्या वतीने पत्र देण्यात आले आहे.

पोलीस पाटील हा महसूल विभाग आणि गृह विभाग यांच्याशी संलग्न असतो गावात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम ते करीत असतात. शासनाच्या परिपत्रक नुसार ग्रामपंचायत कार्यालयात जनसुविधा केंद्रासह (अन्य एक शासकीय कर्मचारी ) व पोलिस पाटील यांना ग्रामपंचायत कार्यालयात खोली उपलब्ध व्हावी यासाठी येथील सारमाळ गांवचे पोलिस पाटील रामदास राव व सुभाष (नाना) डिंगोरे यांनी पोलीस पाटील संघटना वतीने गटविकास अधिकारी, पंचायत समिती शहापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती.

या केलेल्या मागणीनुसार शासन निर्णयानुसार ज्या ग्रामपंचायतीमध्ये राजीव गांधी पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधलेले आहेत. अशा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये पोलिस पाटील व अन्य एक शासकीय कर्मचारी यांना कार्यालयीन वापरासाठी एक खोली देण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी असे पत्र गटविकास अधिकारी यांच्या वतीने ग्रामपंचायत विभागांना देण्यात आले आहे.

# केडीएमसी सफाई कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा

## कचऱ्यात सापडलेले सोन्याचे दागिने महिलेला केले परत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : नजरचुकीने कचऱ्यात गेलेला महागडा सोन्याचा हार महिलेला परत मिळवून दिल्याच्या घटनेला एक महिनाही उलटत तोच केडीएमसी सफाई कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या आणखी एका प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कल्याण पूर्वेतीलच एका महिलेचे कचऱ्यामध्ये चुकून गेलेले सोन्याचे कानातले परत मिळवून देण्याचा सकारात्मक प्रकार समोर आला आहे. कल्याण पूर्वेच्या ड प्रभाग क्षेत्र कार्यालयाजवळील पूना लिंक रोडवर जय शिव सह्याद्री हौ. सोसायटी नावाची चाळ आहे. या परिसरातून केडीएमसी - सुमित एल्कोप्लास्टच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सकाळच्या वेळेत नेहमीप्रमाणे



कचरा संकलन केले. त्यावेळी या चाळीमध्ये राहणाऱ्या अंकिता मोरे यांचे सुमारे 1 तोळयाचे आणि लाख रुपये किमतीचे सोन्याचे जुने कानातले नजरचुकीने कचऱ्यात टाकले गेले. मात्र ही बाब त्यांच्या लक्षात येईपर्यंत साधारणपणे तासभर वेळ होऊन गेला होता. त्यानंतर अंकिता यांनी लगेचच सुमित कंपनीचे सुपर वायजर भूषण सूर्यवंशी यांच्याशी संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितल्यानंतर सूर्यवंशी यांनी लगेचच संबंधित गाडीचे लोकेशन शोधून काढले. ही गाडी त्याच परिसरातील नूतन ज्ञानमंदिर शाळेजवळच कचरा संकलनाचे काम करत होती.

भूषण सूर्यवंशी यांनी तात्काळ अंकिता मोरे यांना त्याठिकाणी घेऊन गेले. आणि घंटागाडीसोबत उपस्थित असलेल्या विनोद बेलीलकर, चैतन्य वाजे, सुनील तेलम या कर्मचाऱ्यांनी गाडीतील सर्व कचरा तिकडेच रस्त्यावर उतरवला. त्यानंतर अंकिता मोरे यांच्या उपस्थितीत कचऱ्यातील प्रत्येक पिशवी आणि कागदाची पुडी त्यांनी तपासून पहिली. आणि अखेर तब्बल पाऊण एक तासाच्या अथक शोधमोहीमेनंतर मोरे यांचे कानातले असलेली कचऱ्याची पिशवी सापडली. आणि मग अंकिता यांच्या चेहऱ्यावरील दुखाश्रूंचे आनंदाश्रुंमध्ये रूपांतर झाले. यावेळी केडीएमसीचे स्वच्छता निरीक्षक अमित भालेराव आणि सुमित एल्कोप्लास्ट कंपनीचे युनिट ऑफिसर समीर खाडे हेदेखील उपस्थित होते.

तर आपण सातव्या इयत्तेमध्ये असताना आई बाबांनी खास माझ्यासाठी हे सोन्याचे कानातले केले होते. आज माझ्या लग्नाला सत्तावीस वर्षे झाली असून हे केवळ कानातले नाही तर माझ्या आई वडिलांची आठवणच आहे. आणि ते परत मिळवून दिल्याबद्दल केडीएमसी सफाई कर्मचारी आणि सुमित एल्कोप्लास्ट कंपनीचे आभार मानले आहेत.

# अद्विका भंडारेची तायक्वांदो स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : कराटे आणि तायक्वांदो या मार्शल आर्ट्समध्ये मुलींची झपाट्याने भरारी सुरू असून राज्यभरातील विविध स्पर्धांमध्ये त्यांची चमकदार कामगिरी पाहायला मिळत आहे. शिस्तबद्ध प्रशिक्षण, कठोर परिश्रम आणि अविचल आत्मविश्वास यांच्या जोरावर मुली सातत्याने पदकांची कमाई करत समाजात स्त्रीशक्तीचा एक नवा आदर्श निर्माण करत आहेत. "काता", "कुमिते", "फुल कॉन्टॅक्ट" तसेच तायक्वांदोच्या अनेक तांत्रिक श्रेणींमध्ये मुली उत्कृष्ट प्रदर्शन करत असून ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या मर्यादित परिस्थितीतून उभ्या राहणाऱ्या अनेक तरुणींनी स्पर्धात्मक जगतात आपली मोहोर उमटवली आहे. या मुलींच्या यशोगाथा इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत.

मार्शल आर्ट्सच्या प्रशिक्षणामुळे मुलींच्या आत्मरक्षण क्षमतेत वाढ, मानसिक ताकद, शिस्त, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमतेचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे पालकांमध्ये मुलींना



कराटेतायक्वांदो शिकवण्याविषयी जागरूकता व सकारात्मकता वाढत असून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने नवीन पाऊल पडत आहे.मार्शल आर्ट्समुळे मुलींसाठी प्रशिक्षक, खेळाडू, सेल्फ-डिफेन्स प्रशिक्षक, फिटनेस ट्रेनर अशा अनेक करिअरच्या वाटा खुल्या होत आहेत. त्यांची ही सातत्यपूर्ण प्रगती ही देशाच्या स्त्री-स्वाभिमानाची आणि प्रगतीशील विचारसरणीची ठळक ओळख आहे.

रॅडक्लीफ रॅप्सोडी तायक्वांडो स्पर्धेत कु. अद्विका भंडारे विजयी सुवर्णपदकाने शाळेचा मान उज्वल. रॅडक्लीफ ग्रुप ऑफ स्कूल्सतर्फे आयोजित रॅडक्लीफ रॅप्सोडी आंतरशालेय तायक्वांडो स्पर्धा २०२५ चे आयोजन ३० नोव्हेंबर २०२५ रोजी रॅडक्लीफ शाळा, सेक्टर ८, खारघर येथे दिमाखात पार पडले. नवी मुंबई, ठाणे, कल्याण आणि बदलापूर येथील विविध शाळांमधून १५० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवून स्पर्धेला उत्साहाचे मोठे स्वरूप दिले.

या स्पर्धेत खारघर येथील रॅडक्लीफ शाळेची विद्यार्थीनी आणि कामोठे येथील रहिवासी वडील ॲड.बलराज. वाय. भंडारे आणि आई सौं. कांचन बलराज भंडारे यांची मुलगी कु.अद्विका बलराज भंडारे हिने ८ ते १२ वयोगटात अप्रतिम कौशल्याचे दर्शन घडवून सर्वांना भुरळ घातली. तिने वेग, संतुलन, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत अंतिम फेरीत भक्कम विजय मिळवला आणि सुवर्णपदक आपल्या नावे केले. अद्विकाच्या या तेजस्वी कामगिरीने शाळेचा आणि परिसराचा मान उंचावला असून तिच्या मेहनतीचे, चिकाटीचे व शिस्तीचे शिक्षक आणि पालकांनी मनापासून कौतुक केले आहे.

# आ. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रदीप महादू जोशी यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली पश्चिमेकडील गणेश नगर , प्रभाग क्रमांक 21 येथे प्रदीप महादू जोशी यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष आमदार, रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पार पडले. या उद्घाटन सोहळयात कल्याण जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब, दीपेश म्हात्रे माजी स्थायी समिती सभापती, नंदू म्हात्रे सौ विद्या राजेश म्हात्रे प्रकाश भोईर माजी नगरसेवक, तसेच अनेक कार्यकर्ते, स्थानिक नागरिकाच्या उपस्थितीत मोठ्या जल्लोषात जलसंपर्क



कार्यालयाचे उद्घाटन झाले नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडवण्यासाठी आणि प्रभागातील विकासाला गती देण्यासाठी हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजवेल. प्रदीप महादू जोशी हे भाजपमध्ये गेल्या 40 वर्षापासून कार्यरत असून त्यांचा जनसंपर्क मोठा आहे येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीमध्ये प्रदीप जोशी हे इच्छुक असून त्यांच्याकडे कार्यकर्त्यांचे आणि स्थानिक नागरिकांचे पाठबळ मोठे आहे. या कार्यक्रमात विनोद सोनवणे दिनेश जोशी नरेंद्र भंडारकर अमोल ठाकूर निशांत जोशी, रेशमा जोशी मनीषा भारंबे या सर्व कार्यकर्त्यांमुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024